MHBU190002252025

म.सं.कौ.हिं.का. अर्ज **क्र.०८/२०२५**
किरण जोशी – वि. – भारत किसन जोशी

## निशाणी क्र.१२ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज हा विना लेखी जबाब आदेश रद्द होऊन गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांना लेखी जबाब देण्याची परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

२. गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांनी असे नमूद केले की, सदर प्रकरण गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांच्या विरूध्द दाखल केलेले आहे. सदर प्रकरणातील अर्जदाराने दाखल केलेल्या नक्कला संबधित संरक्षण अधिकारी यांनी नोटीस बजावतांना गैरअर्जदार यांना दिलेल्या नाही. त्यामुळे गैरअर्जदार यांना मुदतीमध्ये लेखी जबाब दाखल करता आला नाही. सदर लेखी जबाब आजरोजी गैरअर्जदार क्र. १ ते ५ न्यायालयात दाखल करित आहेत. सदर लेखी जबाब दाखल केल्यानंतर सत्यपरस्थिती काय आहे ती न्यायालयासमोर येईल. गैरअर्जदार यांचा विलंब करण्याचा कोणताही हेतु नाही. गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांनी शुध्द हेतुने सदर अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे न्यायीक दृष्टीच्या वतीने गैरअर्जदाराचे म्हणणे न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांना लेखी जबाब सादर करण्याची संधी देणे अत्यंत न्याय व जरुरी आहे. त्यामुळे न्यायालयाने दि. २८/१०/२०२५ रोजी केलेला नो डब्ल्यु एस आदेश सेट असाईड होऊन मिळणे न्याय व जरूरी आहे. तसेच गैरअर्जदारांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. करिता अर्ज मंजुर करण्यात यावा ही विनंती.

३. अर्जदार यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.१२ वर सादर केले. त्यांनी अर्जास तिव्र विरोध केला. गैरअर्जदारातर्फे जाणीवपूर्वक प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या उद्देशाने व अर्जदार हिला मानसिक त्रास होण्याच्या उद्देशाने गैरअर्जदाराने प्रकरणामध्ये वारंवार प्रकरण तहकुब केले आहे. गैरअर्जदारांना कोणतेही संयुक्तिक कारण नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर व्हावा. अर्जदार हिला त्रासापोटी ५०००/– रू कॉस्ट मिळावी.

४. अभिलेखाची पाहणी केली असे दिसून येते की, दोन्ही विधिज्ञांचे म्हणणे एकले असे दिसून येते की, अर्जदार यांनी सदरचा अर्ज गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांच्या विरूध्द दाखल केला आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने गैरअर्जदार यांना नोटीस लागल्या परंतु गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणणे मुदतीत सादर केले नाही त्यामुळे न्यायालयाने दि. २८/१०/२०२५ रोजी विना म्हणणे पुढे चालविला. गैरअर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेले कारण संयुक्तिक नाही. परंतु न्यायाच्या दुष्टीने गैरअर्जदार यांचा लेखी जबाब अभिलेखावर असणे गरजेचे आहे. परंतु गैरअर्जदार यांनी केलेला विलंब याकरिता त्यांना खर्च लावता येईल व सदरचा खर्च अर्जदार यांना देता येईल. असे केल्यास अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होतांना दिसत नाही याउलट अर्ज हा गुणवत्तेच्या आधारावर निकाली काढता येईल परंतु गैरअर्जदार यांनी केलेला विलंब यांना रक्कम रू. २०००/– खर्च लावून विना लेखी म्हणणे आदेश रद्द करता येईल व गैरअर्जदार यांनी लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी देता येईल. त्यामुळे वरील चर्चाअंती खालील आदेश रद्द करण्यात येत आहेत.

**<u>–आदेश</u> –**

१. नि.क्र. १२ २०००/– रू. खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. दि. २८/१०/२०२५ रोजीचा उलटतपास आदेश रद्द करण्यात येतो व गैरअर्जदार यांना लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३. सदरचा अर्ज हा खालील अटिवर मंजुर करण्यात येतो.

४. गैरअर्जदार यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेला अर्जदार यांना देण्यात यावी. खर्चाची रक्कम गैरअर्जदार यांनी अर्जदार यांना पुढील तारखेला न दिल्यास विना लेखी म्हणणे आदेश रद्द होणार नाही.

Digitally signed by PRAFUL BHARAT TELGOTE
Date: 2026.08.03 18:19:13 +0530

दिनांक : ०३/०८/२०२६ (प्रफुल भा. तेलगोटे)

स्थळ : सिंदखेड राजा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सिंदखेड राजा.